# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय (स्थायी) सभा दिनांक ०१/०६/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक ०१/०६/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या पाणी पुरवठा, आरोग्य, विधी व कामगार, कर विभाग तसेच संगणक विभागांतर्गत करावयाच्या / केलेल्या कामांच्या निवीदा सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या त्यानुसार विहित मुदती प्राप्त कमी दरांच्या निविदांवर विचारविनिमय करून कमी दरांच्या निविदांना मंजुरी तथा कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याकरिता प्रशासकीय (स्थायी) सभेचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानुसार प्र. आरोग्य निरीक्षक व पाणी पुरवठा अभियंता, प्रभारी विधी व कामगार परीवेक्षक यांनी सादर केलेल्या कामांच्या निविदांचा तुलनात्मक अहवालावरील मुख्याधिकारी यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.

**विषय क्र १ :- आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२२-२०२३ अंतर्गत मौजे मलकापूर येथे नगर परिषद मालकीच्या जागेवर सलीम चौहान यांचे घरापासून ते अरीफभाई रॉकेलवाले यांचे घरापर्यंत पाईप लाईन टाकणे.**

**विषय क्र २ :- SBM २.० अंतर्गत मैला उपसा यंत्र खरेदी करणे करिता प्राप्त दरपत्रकास मंजुरी मिळणेबाबत.**

**विषय क्र ३ :- SBM १.० DPR changes नुसार श्रेडर मशीन खरेदी करणे बाबत.**

**विषय क्र ४ :- मलकापूर नगर परिषदेचे** National Green Tribunal Pune **येथे चालू असलेल्या याचिकेच्या वकिलाचे देयक अदा करण्यास मान्यता मिळणे बाबत**

**विषय क्र ५ :- मलकापूर नगर परिषदेतील कर संग्रहक यांच्याकरिता कंत्राटी पद्धतीने मदतनीस उपलब्ध करून देण्याबाबत.**

**विषय क्र ६ :- मलकापूर नगर परिषदेतील संगणक विभागांच्या सी.सी.टी.व्ही. खरेदी व दुरुस्ती बाबत प्राप्त कमी दाराच्या निविदेस मान्यता देणेबाबत.**

**विषय क्र ७ :- मलकापूर नगर परिषदेतील संगणक विभागांच्या संगणक खरेदी व दुरुस्ती बाबत प्राप्त कमी दाराच्या निविदेस मान्यता देणेबाबत.**

---

**विषय क्र १ :- आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२२-२०२३ अंतर्गत मौजे मलकापूर येथे नगर परिषद मालकीच्या जागेवर सलीम चौहान यांचे घरापासून ते अरीफभाई रॉकेलवाले यांचे घरापर्यंत पाईप लाईन टाकणे.**

वरील कामाची निवीदा आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२२-२०२३ निधी अंतर्गत दिनांक १२/०४/२०२३ रोजीच्या दैनिक सम्राट व साप्ता. वादळातील नौकासारखा समाज या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे विहित मुदतीत निवीदा प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

प्रशासकीय मंजुरी :- प्रशासकीय सभा ठराव क्र २ दिनांक २२/०२/२०२३
वर्तमानपत्र :- दैनिक सम्राट व साप्ता. वादळातील नौकासारखा समाज दि १२/०४/२०२३
अंदाजपत्रकीय किंमत :- ४,९५,०००/-

| अ.क्र. | निवीदा धारकाचे नाव | निविदेत सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1 | शिवम प्रमोद डवले | अंदाजपत्रकीय दराने |
| 2 | राजेंद्र मोतीसिंग नाईक | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २ % जास्त दराने |
| 3 | अक्षय राजकुमार भंसाली | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १ % जास्त दराने |

वरील सर्व बाबींचा विचार करता सर्वात कमी दर म्हणजे अंदाजपत्रकीय दराने **शिवम प्रमोद डवले** यांच्या निविदेस तसेच सदर खर्च आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२२-२०२३ निधीतून करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे .

**विषय क्र २ :- SBM २.० अंतर्गत मैला उपसा यंत्र खरेदी करणे करिता प्राप्त दरपत्रकास मंजुरी मिळणेबाबत.**

वरील कामासाठी SBM २.० निधी अंतर्गत Quotation Notice नोटीस बोर्डवर लाऊन खुल्या बाजारातून दरपत्रक घेण्यात आले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे तुलनात्मक अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | निवीदा धारकाचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1 | डेक्कन इंजिनिअरस | २५,८५,०००/- |
| 2 | के.आर. ए. ट्रेडर्स | २६,५५,०००/- |
| 3 | एस. एस. इंजिनियर्स | २५,००,०००/- |

वरील प्राप्त निविदांचा तुलनात्मक अहवाल प्र. आरोग्य निरीक्षक यांनी तयार करून सादर केलेला आहे. सदर तुलनात्मक अहवालाचे अवलोकन करण्यात आले. त्यानुसार **एस. एस. इंजिनियर्स** यांचे दर सर्वात कमी म्हणजे रु. २५.०० लक्ष इतके नमूद करण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांच्या निविदेस तसेच सदर खर्च SBM २.० निधीतून करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे .

**विषय क्र ३ :- SBM १.० DPR changes नुसार श्रेडर मशीन खरेदी करणे बाबत..**

वरील कामासाठी SBM १.० DPR changes निधी अंतर्गत Quotation Notice नोटीस बोर्ड वर लाऊन खुल्या बाजारातून दरपत्रक घेण्यात आले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे तुलनात्मक अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | निवीदा धारकाचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1 | हेम कॉर्पोरेशन | १२,७१,५३६/- |
| 2 | हिंद ॲग्रो & केमिकल्स | १२,१०,०००/- |
| 3 | विधाता उर्जा | १२,३२,०००/- |

वरील प्राप्त निविदांचा तुलनात्मक अहवाल प्र. आरोग्य निरीक्षक यांनी तयार करून सादर केलेला आहे. सदर तुलनात्मक अहवालाचे अवलोकन करण्यात आले. त्यानुसार **हिंद ॲग्रो & केमिकल्स** यांचे दर सर्वात कमी म्हणजे रु. १२,१०,०००/- इतके नमूद करण्यात आलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता सर्वात कमी दराची **हिंद ॲग्रो & केमिकल्स** यांच्या निविदेस तसेच सदर खर्च SBM १.० DPR changes निधीतून करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे .

**विषय क्र ४ :- मलकापूर नगर परिषदेचे National Green Tribunal Pune येथे चालू असलेल्या याचिकेच्या वकिलाचे देयक अदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.**

मलकापूर नगर परिषदेच्या National Green Tribunal Pune येथे दाखल असलेल्या Original App. No.-131/2017(wz) या याचिकेच्या संबंधाने न. प.चे विधी सल्लागार म्हणून नेमणूक केलेली असून

सदर प्रकरणा संबंधित वकिलाचे फी व कोर्ट खर्चाचे देयक न.प. कार्यालयास प्राप्त झाले असून त्याचे विवरण खालील प्रमाणे.

| अ.क्र. | याचिका क्र. | वकिलाचे नाव | वकील फी व कोर्ट खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | Or.App.No.131/2017 | ॲड. विलास महाजन | ६०,०००/- |

वरील सर्व बाबींचा विचार करता मलकापूर न.प. च्या National Green Tribunal Pune येथे दाखल असलेल्या याचिका प्रकरणा संबंधित वकिलाचे फी व कोर्ट खर्च न.प. निधीतून अदा करण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे .

**विषय क्र ५ :- मलकापूर नगर परिषदेतील कर संग्रहक यांच्याकरिता कंत्राटी पद्धतीने मदतनीस उपलब्ध करून देण्याबाबत.**

प्रशासकीय मंजुरी :- प्रशासकीय सभा ठराव क्र ७ दिनांक ०९/०५/२०२३

वर्तमानपत्र :- दैनिक जळगाव वृत्त दि १८/०५/२०२३

| अ. क्र. | कामाचे विवरण | परिणाम | प्रसाद आर गायकवाड | अविनाश गोपाल जामोदे | मुश्ताक़ खान जब्बार खान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता / पाणीपट्टी कर मागणी नोंदवही लिहिणे | प्रती मालमत्ता | ८/- | ७/- | ७.५०/- |
| 2 | मालमत्ता / पाणीपट्टी कर मागणी देयक लिहिणे | प्रती मालमत्ता | ९/- | ७/- | ९/- |
| 3 | मालमत्ता / पाणीपट्टी कर मागणी देयक घरोघरी वितरित करणे | प्रती मालमत्ता | ९.५/- | ६/- | ८/- |
| ४ | मालमत्ता / पाणीपट्टी कर मागणी Microsoft Excel मध्ये भरून देणे | प्रती मालमत्ता | ११/- | ७/- | १०/- |

वरील प्राप्त निविदांचा तुलनात्मक अहवाल कर निरीक्षक यांनी तयार करून सादर केलेला आहे. सदर तुलनात्मक अहवालाचे अवलोकन करण्यात आले. त्यानुसार **अविनाश गोपाल जामोदे** यांचे दर सर्वात कमी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरी त्यांच्या निविदेस तसेच सदर खर्च नगर परिषद निधीतून करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे .

**विषय क्र ६ :- मलकापूर नगर परिषदेतील संगणक विभागांच्या सी.सी.टी.व्ही. खरेदी व दुरुस्ती बाबत प्राप्त कमी दाराच्या निविदेस मान्यता देणेबाबत.**

वर्तमानपत्र :- दै. पुण्य नगरी दिनांक १०/०३/२०२३

ई-निविदा क्र :- 2023_DMA_882828_1

| अ.क्र. | निवीदा धारकाचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1 | श्री मल्टी सर्विसेस | २,१४,८००/- |
| 2 | श्री कॉम्पुटर सिस्टीम | २,३२,१५२/- |
| 3 | माउली कॉम्पुटर | २,३६,२५७/- |

वरील प्राप्त निविदांचा तुलनात्मक अहवाल संगणक अभियंता यांनी तयार करून सादर केलेला आहे. सदर तुलनात्मक अहवालाचे अवलोकन करण्यात आले. त्यानुसार **श्री मल्टी सर्विसेस** यांचे दर सर्वात कमी

असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरी त्यांच्या निविदेस तसेच सदर खर्च नगर परिषद निधीतून करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे .

**विषय क्र ७ :- मलकापूर नगर परिषदेतील संगणक विभागांच्या संगणक खरेदी व दुरुस्ती बाबत प्राप्त कमी दाराच्या निविदेस मान्यता देणेबाबत.**

वर्तमानपत्र :- दै. पुण्य नगरी दिनांक १०/०३/२०२३

ई-निविदा क्र :- 2023_DMA_882828_2

| अ.क्र. | निवीदा धारकाचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1 | श्री कॉम्पुटर सिस्टीम | ८,३२,१२३/- |
| 2 | श्री मल्टी सर्विसेस | ८,७९,३५०/- |
| 3 | माउली कॉम्पुटर | ८,७९,८८१/- |

वरील प्राप्त निविदांचा तुलनात्मक अहवाल संगणक अभियंता यांनी तयार करून सादर केलेला आहे. सदर तुलनात्मक अहवालाचे अवलोकन करण्यात आले. त्यानुसार **श्री कॉम्पुटर सर्विसेस** यांचे दर सर्वात कमी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरी त्यांच्या निविदेस तसेच सदर खर्च नगर परिषद निधीतून करण्यास ही सभा त्यास मान्यता देत आहे .

(आर.यु.सुरडकर)
प्रशासक
नगर परिषद मलकापूर